# फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली

## ग्रंथालय विभाग

## वार्षिक अहवाल

## २०२२ - २०२३

मा. प्राचार्य
फुले- आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,
गडचिरोली

विषय:- ग्रंथालय विभागाचा अहवाल स्विकारण्याबाबत.

संदर्भ:- पत्र क्र.- एफएएसडब्ल्यु./गड./ नुसार

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सत्र २०२२-२३ मध्ये ग्रंथालय विभागाव्दारे आयोजित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल स्विकारून सहकार्य करावे ही विनंती.

दिनांक :- / /२०२३

ग्रंथालय विभाग प्रमुख
फुले- आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क,
गडचिरोली

सहपत्र:- ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल

# फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली.

# ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल

# शैक्षणिक सत्र २०२२ – २०२३

## ग्रंथालय विभाग

## ग्रंथालय आकडेवारी व वार्षिक अहवाल

ग्रंथालयीन वर्षभरात केलेल्या कार्याची आकडेवारी, वर्षभरात केलेल्या प्रगतीची माहिती सर्व कार्य, घडामोडींचा समावेश वार्षिक अहवालात केलेला आहे. त्यामध्ये वार्षिक अहवालाचे वर्ष, नाव, सभासद संख्या, वर्षात किती दिवस ग्रंथालय उघडे होते, कामकाजाच्या वेळा, ग्रंथालय समिती, वाचन साहित्य, ग्रंथालय सेवा, तांत्रीक सेवा, सेवक वर्ग, इमारत व उपकरणे, संगणकीकरण व इतर माहिती इत्यादी सर्व माहिती ग्रंथालयीन वार्षिक अहवालात समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन ग्रंथालयात समाजकार्य अभ्यासक्रमाची क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, कथा, कांदबरी, नाटके, कविता, भाषाविषयक पुस्तके, दलित साहित्य चरित्रात्मक ग्रंथ व इतर विषयांच्या साहित्यासह उपलब्ध आहे .

ग्रंथालयामध्ये भव्य ग्रंथ संग्रह असुन त्यामध्ये शोधप्रंबध तसेच दुर्मीळ ग्रंथसंग्रह उपलब्ध आहेत. ग्रंथालयाचा उपभोग महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि इतर सभासद घेतात.

ग्रंथालयाचे वाचन कक्ष मोठे असून या वाचन कक्षात ३० विद्यार्थी बसण्याची सोय आहे. तसेच कार्यालयीन वेळेत देवघेव विभाग, वाचन कक्ष, ग्रंथालयीन कामकाज सकाळी १०.३० ते ५.३० पर्यंत नियमित सुरु असते.

तसेच ग्रंथालयामध्ये ग्रंथपार्जन विभाग, ग्रंथालय देवघेव विभाग, संदर्भ विभाग, नियतकालिका विभाग, संशोधन विभाग, वाचन कक्ष

विभाग आणि तांत्रिक विभाग इत्यादी सर्व विभागाव्दारे ग्रंथालय सभासदांना माहिती पुरविण्यात येते.

**<u>ग्रंथालयाव्दारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा :-</u>**

ग्रंथ देवान - घेवान सेवा **( Issue Return Service )**

संदर्भ व माहिती सेवा **(Reference and Information Service )**

स्पर्धात्मक पुस्तके **(Competitive Books)**

स्पर्धात्मक मासिके **(Competitive Magazine)**

दैनिक वृत्तपत्र/रोजगार समाचार **(Daily News Paper and Employment News Service)**

वर्तमानपत्र कात्रण सेवा **( News Paper Clipping Service )**

दुर्मीळ ग्रंथ संग्रह आणि नकाशे **( Map and Rare Books Collection )**

शोध प्रबंध संग्रह **(Theses Collection )**

ग्रंथसुची विषयक सेवा **( Bibliographical Service )**

लायब्ररी ओरीएन्टेशन **( Library Orientation to Users )** इत्यादी सेवा दिल्या जातात.

ग्रंथालय सुरू असणारे दिवस **( Working Days )**

जानेवारी ते डिसेंबर २०२२ पर्यंत ३६५ दिवस

एकुण रविवार आणि सणाच्या सुट्या ७५ दिवस

..................

ग्रंथालय सुरु २९० दिवस

**⁕ ग्रंथालयीन माहिती**

एकुण ग्रंथ संख्या - १०,४६०

एकुण ग्रंथांची किंमत - १६,०६,३१९.९५ रू.

एकुण नियतकालीकांची संख्या - १७

एकुण वर्तमानपत्रे - ०६ (४ मराठी, १ हिंदी, १ इंग्रजी)

एकुण नियतकालीके - १७

बि.एस.डब्ल्यु.-**<u>३३६</u>** + एम.एस.डब्ल्यु.-**<u>८२३</u>** = एकुण शोध प्रबंध- **<u>११५९</u>**

* **ग्रंथालयीन उपस्काराची माहिती**

| | |
|---|---|
| एकुण ग्रंथ कपाटांची संख्या - ३१ | नियतकालीके डिस्प्ले रॅक - ०१ |
| ओपन रॅक - ०५ | तालीकीकरण पेटी - ०१ |
| कार्यालयीन कपाट - ०१ | ग्रंथालयीन एकुण खुर्च्याची संख्या - ६० |
| ऑफीस टेबल - ०५ | संगणक टेबल - ०१ |
| ग्रंथालयीन नियमावली - ०२ | ग्रंथालयीन फोटो - २२ |
| फॅन - ०६ | ग्रंथालयातील एकुण टेबलांची संख्या- ०५ |
| ग्रंथालयीन संगणक - ०१ | घड्याळ - ०१ |
| विद्यार्थी सुचना पाट्या - ०८ | नोटीस बोर्ड - ०१ |
| ट्युब लाईटस - ०८ | स्पोर्ट ड्रेस - ११ |
| आदिवासी साहित्य (बासरी, कुऱ्हाड, कंदील) प्रत्येकी - ०१ | |

**ग्रंथालय सभासद (विद्यार्थी) - सभासदपत्र माहिती विवरण -**

| अ. क्र. | वर्ग | एकुण विद्यार्थी संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | विद्यार्थीनींची संख्या | बि. टी. कार्ड न घेणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बि.एस.डब्ल्यु. १ | ६० | २१ | ३९ | ०१ (विद्यार्थी), ० (विद्यार्थीनी) |
| 2 | बि.एस.डब्ल्यु. २ | ५८ | १८ | ४० | ०१ (विद्यार्थी), ०३ (विद्यार्थीनी) |
| 3 | बि.एस.डब्ल्यु. ३ | ४२ | ११ | ३१ | ०३ (विद्यार्थी), ०१ (विद्यार्थीनी) |
| 4 | एम.एस.डब्ल्यु.१ | ६० | २० | ४० | ०२ (विद्यार्थी), ०१ (विद्यार्थीनी) |
| 5 | एम.एस.डब्ल्यु.२ | ५५ | १६ | ३९ | ०४ (विद्यार्थी), ०१ (विद्यार्थीनी) |
| | एकुण | २७५ | ८६ | १८९ | ११(विद्यार्थी), ०६ (विद्यार्थीनी) |

**विद्यार्थी ग्रंथ देव- घेव -**

| अ. क्र. | वर्ग | सत्र | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| 1 | बि.एस.डब्ल्यु १ | ५४९ | २६० | ३४२ | ३४४ |
| 2 | बि.एस.डब्ल्यु २ | ५२४ | ६६ | ३८१ | ३७७ |
| 3 | बि.एस.डब्ल्यु ३ | ४६४ | ११७ | २७१ | ४३० |
| 4 | एम.एस.डब्ल्यु १ | ८१७ | २३४ | ३९० | ६१८ |
| 5 | एम.एस.डब्ल्यु. २ | ५२० | ३६५ | ९६ | २८१ |
| | एकुण | २७१९ | ७७३ | १६९४ | २०५० |

**ग्रंथालय सभासद (विद्यार्थी) येणे- जाणे -**

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र | एकुण |
|---|---|---|
| ७८६ | ८६८ | १६५४ |

**ग्रंथालय सभासद (प्राध्यापक) ग्रंथ देव- घेव -**

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र | एकुण |
|---|---|---|
| ६७ | ६२ | १२९ |

**सत्र २०२२-२३ मध्ये ग्रंथायलयीन कर्मचार्यांनी पुढील प्रमाणे नियीमत ग्रंथालयीन कार्ये व्यतिरीक्त पार पाडलेली कार्ये -**

**१)** सांस्कृतिक व क्रीडा विभागा अंतर्गत कामे.

**२)** ग्रंथालयातील संगणक संचाची व प्रिंटरची निगा राखुन त्यात काही बिघाड झाल्यास संबंधीतांना माहिती देण्यात आली.

**३)** ग्रंथालयातील विजेचा वापर टाळण्यासाठी विद्युत साहित्यांवर देखरेख करण्यात आले.

**४)** महाविद्यालयाचे वाटर कुलर, वाटर मोटार पंप इत्यादीचे निराकरण करण्यात आले.

**५)** महाविद्यालयीन परीसराची व वर्ग खोल्यांची साफसफाई करवुन घेण्यात आली.

**६)** महाविद्यालयातील प्राध्यपकांचे टाईपिंगची कामे करवुन घेण्यात आली.

वरील सर्व कार्य व नियंत्रण, देखरेख आणि व्यवस्थापन करण्यात येते.

**ग्रंथालय विभागाव्दारे विविध कार्यक्रम-**

मानवाला वाचनाचे महत्व समजले तर तो स्वतः परिस्थितीवर मात करायला शिकेल व त्याच बरोबर आपल्या कुटंबालासुध्दा संघर्षाशी सामना करायला शिकवेल. एक वेळा का विचारांची पातळी बदलली तर समाजपरिवर्तन होण्यास वेळ लागणार नाही, एवढी मोठी शक्ती वाचनात आहे.

**वाचन :**

अभ्यासाचे प्रमुख साधन म्हणजे वाचन. वाचन करणे ही एक काळाची गरज आहे. वाचन हा विरंगुळा आहे. वाचन हा मनोरंजन आहे. एकदा का वाचनाची सवय लागली तर त्यांच्या जीवनातील मानसिक उदासिनता दूर होण्यास काहीच वेळ लागत नाही. वाचनाचा समाज जीवनावरही परिणाम होतो.

**वाचनाची गरजः**

मनोरंजन, साहित्यप्रकारांची ओळख, एकाग्रता वाढविण्यासाठी शिकण्याचे साधन, साक्षरता, वाचनानंद, दैनंदिन व्यवहारासाठी, राश्ट्रविकासासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी, व्यक्तीमत्व विकासासाठी, दुसर्यांना विचार समजण्यासाठी, दुसर्यांना विचार करायला लावण्यासाठी, कल्पनाशक्ती व भावनीक विकासासाठी, लेखन, भाषण कौशल्यवाढीसाठी, संस्कारासाठी, भाषासमृध्दीसाठी तसेच इत्यादी गोष्टी करिता वाचन आवश्यक आहे. शिक्षण हा पाया आणि ग्रंथ त्याचे हृदय

आहे. विद्यार्थी दशेत ह्या गोष्टींनाच महत्व आहे. त्यानुसार कार्यक्रम घेण्यात आले व कार्य करण्यात आले.

*** ग्रंथालय विभाग**

**कार्यक्रम क्रमांक - १**

**<u>ग्रंथपाल दिन साजरा व वाचन प्रश्नमंजुषा स्पर्धा -</u>**

महाविद्यालयाच्या ग्रंथालाय विभागाद्वारे दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथान यांची जयंती **“ग्रंथपाल दिन”** म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.के. खंगार आणि महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

VIDARBHA NEWS EXPRESS VNX
72k Followers

**फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी**



12 Aug 2022 . 3:55 PM

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**
**प्रतिनिधी / गडचिरोली** : स्थानिक श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारा संचालित फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागाद्वारे “ग्रंथपाल दिन” साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्वप्रथम रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दीप प्रज्वलन करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश खंगार तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. यादव गहाणे, प्रा. डॉ. अभय लाकडे, प्रा. डॉ. रुपेंद्र गौर, प्रा. अजय निंबाळकर, प्रा. विनोद कुकडे, प्रा. डॉ. दिलीप बारसागडे, प्रा. सरिता बुटले, प्रा. डॉ. किशोर कुडे, प्रा. कविता उईके, प्रा. दीपक तायडे, प्रा. सुरेश कंती व सुधाकर इंगुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य आणि ग्रंथपाल दिनाच्या शुभेच्छा देऊन डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला तसेच ग्रंथालयाचा विकास विस्तार ग्रंथालयाची सेवा सुविधा आणि उपक्रम यांची प्रशंसा केली.
कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक ग्रंथालय प्रमुख प्रा. डॉ. कु. वर्षा तिडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार हितेश धानोरकर यांनी केले.
कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता देवेंद्र वासेकर, कु. अनिता ठाकूर, प्रमोद शेंडे, महेंद्र जनबंधू, लोमेश देशमुख, राजेश पोहाने, कु. कादंबरी केदार, इम्रान पठाण, दीपक तिजारे, नरेश चंदेल, मनोज देशमुख, लक्ष्मीकांत जोगी, माणिक माटे आदी कर्मचारी उपस्थित होते.

---------------------------------------------------

**कार्यक्रम क्र. २**

**<u>स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्य राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा -</u>**

महाविद्यालयाच्या ग्रंथालाय विभागाद्वारे दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्य राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली. यात १०२ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला तसेच सर्व सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले.



**कार्यक्रम क्र. ३**

**<u>वाचन प्रेरणा दिन साजरा-</u>**

श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली व्दारा संचालीत फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथे दि. १५ ऑक्टोबर २०२२ ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या **९१ व्या** जयंती निमीत्य **" वाचन प्रेरणा दिन "** साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरूवात **भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम** यांच्या प्रतिमेला व्दिपप्रज्वलन व मालार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी बि.एस.डब्लु. आणि एम.एस.डब्लु. च्या प्रथम वर्षाच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता लायब्ररी ओरिएनटेशन (ग्रंथालयाची ओळख) चे आयोजन करण्यात आले. हया कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश खंगार सर उपस्थित होते.






यावेळी ग्रंथपाल प्रा. डॉ. कु. वर्षा तिडके यांनी नवागत विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख, ग्रंथालयीन सेवा व ग्रंथालयाचे विविध विभाग, त्यांचे कार्य इ. सविस्तर माहिती देण्यात आली.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रंथालय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

vnxpres.com/detai

► **फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क गडचिरोली येथे वाचन प्रेरणा दिन साजरा**

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**



**प्रतिनिधी / गडचिरोली :** स्थानीक श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली व्दारा संचालीत फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोऽशल वर्क, गडचिरोली येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९१ व्या जयंती निमीत्य वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरूवात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला द्वीपप्रज्वलन व मालार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी बि. एस. डब्लु. आणि एम. एस. डब्लु. च्या प्रथम वर्षाच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता लायब्ररी ओरिएनटेशन (ग्रंथालयाची ओळख) चे आयोजन करण्यात आले. हया कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश खंगार उपस्थित होते.

यावेळी ग्रंथपाल प्रा. डॉ. कु. वर्षा तिडके यांनी नवागत विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख, ग्रंथालयीन सेवा व ग्रंथालयाचे विविध विभाग, त्यांचे कार्य इ. सविस्तर माहिती देण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रंथालय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

**कार्यक्रम क्र. ४**

**मा. संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचन्द्र मुनघाटे यांची जयंती साजरी -**

श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथे दि. १८ नोव्हेंबर २०२२ सांस्कृतिक विभागातर्फे श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांची 73 वी जयंती साजरी करण्यात आली.


सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांच्या प्रतिमेला मालार्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांच्या जयंती प्रित्यर्थ महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथप्रदर्शनी आणि प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.







याप्रसंगी ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटक म्हणून गडचिरोली जिल्ह्याचे मा. आमदार डॉ. देवराव होळी साहेब,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस के खंगार सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य प्रा. डॉ. विवेक गोर्लावार, प्रा.डॉ. रुपेंद्रकुमार गौर आदी मान्यवर उपस्थित होते.













यावेळी संस्थेचे संस्थापक मा. प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांचे जीवनकार्य माहित व्हावे या उद्दांत हेतूने जीवनकार्यावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा तिडके यांनी मानले.

सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय विभागाचे कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच विस्तार ग्रंथालयाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Eııll Gııll 0.1K/s ··· 1:09 PM 57%

vnxpres.com/detai 42

विदर्भ NEWS EXPRESS

ADVERTISE WITH

संपादकीय गडचिरोली चंद्रपूर नागपूर भंडारा गोंदिया वर्धा राज्य देश

## ► समाजकार्य महाविद्यालय गडचिरोली येथे प्राचार्य स्व. रमेशचन्द्र मुनघाटे यांची जयंती साजरी

**विदर्भ न्यूज एक्सप्रेस**



**गडचिरोली / गडचिरोली :** स्थानिक श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत फुले - आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथे सांस्कृतिक विभागातर्फे श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांची 73 वी जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांच्या प्रतिमेला मालार्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांच्या जयंती प्रित्यर्थ महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथप्रदर्शनी आणि प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटक म्हणून गडचिरोली जिल्ह्याचे आमदार डॉ. देवराव होळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस के खंगार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य प्रा. डॉ. विवेक गोर्लावार, प्रा. डॉ. रुपेंद्रकुमार गौर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संस्थापक प्राचार्य स्व. रमेशचंद्र मुनघाटे यांचे जीवनकार्य माहित व्हावे या उद्दांत हेतूने जीवनकार्यावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा तिडके यांनी मानले.

सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालय विभागाचे कर्मचारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच विस्तार ग्रंथालयाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशाप्रकारे ग्रंथालय विभागाव्दारे सत्र २०२२-२३ मध्ये कार्यक्रम राबविण्यात आलेत.

सदर अहवाल आपल्या माहितीस सादर ही विनंती.

ग्रंथपाल

प्रा. डॉ. वर्षा ए. तिडके